# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.09.2024** **वार – सोमवार**

---

**लोदि**

पुणे जिल्हास्तरीय लोकशाही दिनात तक्रार निवारण न झालेल्या तीन प्रकरणांवर विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांनी अर्जदारांना त्यांचं म्हणणं मांडण्याची संधी दिली आणि सुनावणी घेतली. जिल्हास्तरावर सुटणाऱ्या समस्यांसाठी नागरिकांना विभागीय लोकशाही दिनात यावे लागतं हे योग्य नाही. जनतेच्या तक्रारी सोडवण्यामध्ये टाळाटाळ अथवा हलगर्जीपणा झाल्याचं निदर्शनास आल्यास अधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरुन प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असंही यावेळी त्यांनी सूचित केलं. यावेळी विविध विभागांचे विभागस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

**मदत**

पुणे उत्सव मित्र मंडळतर्फे एकतानगर इथं पुरामुळं घराचं नुकसान झालेल्या पांडुरंग मानवदकर यांना आर्थिक मदत म्हणून २५ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. यावर्षी मंडळानं 'वारसा पुण्याचा, पुन्हा जपुया' हा सजीव देखावा सादर केला आहे. जुन्या पुण्याची सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक ओळख पुन्हा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन या देखाव्यातून करण्यात आलं आहे.

**रक्तदान**

संत निरंकारी धर्मादाय फाउंडेशनद्वारा आयोजित विशाल रक्तदान शिबिरामध्ये २४० जणांनी रक्तदान केलं, या शिबिराचं उद्घाटन ताराचंद करमचंदानी यांच्या हस्ते झालं. यावेळी खासदार श्रीरंग आप्पा बारणे तसंच संत निरंकारी मंडळाचे इतर पदाधिकारी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**कृषिपूजन**

पुण्यातील न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग प्रशालेत सुरू असलेल्या छंद गणेशोत्सवामध्ये ऋषिपंचमी निमित्तानं, आज विविध क्षेत्रातल्या मान्यवर व्यक्तींचं ऋषिपूजन करण्यात आलं. संस्कृत तज्ञ डॉक्टर श्रीकांत बहुलकर, माजी मुख्याध्यापक श्रीकांत काकडे, माजी शिक्षिका पुष्पा घळसासी आणि माजी शिक्षक बाळासाहेब पानसे या उपस्थित ऋषितुल्य व्यक्तींचं विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात पूजन करून त्यांना श्रीफळ, उपरणं आणि मानपत्र प्रदान करण्यात आलं. तर शतायुषी चित्रकार शि. द. फडणीस आणि शतायुषी भाषातज्ञ यास्मिन शेख यांच्यासह सु. ह. जोशी यांचं त्यांच्या निवासस्थानी जाऊन ऋषिपूजन करण्यात आलं. सध्याच्या काळात ज्ञानार्जनाचं काम करणारे सर्वचजण ऋषितुल्य आहेत, असे गौरवोद्गार डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष विधीज्ञ अशोकराव पलांडे यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना व्यक्त केले. यावेळी शाळासमिती अध्यक्ष डॉक्टर शरद अगरखेडकर, मुख्याध्यापक चारुता प्रभुदेसाई, छंद गणेशोत्सवाच्या कार्याध्यक्ष शारदा जोशी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**कृषि-पंचमी**

पुण्यातील प्राचीन ललित कला प्रबोधिनी आणि कोथरुडमधील समस्त ब्राह्मण सेवा संस्थेनं संयुक्तपणे ऋषी पंचमीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार तसंच कोथरूड-रत्न पुरस्कार वितरण सोहळा आज पार पडला. ऋषीतुल्य व्यक्तींच्या सन्मानाद्वारे सकारात्मक उर्जेची निर्मिती होते असं याप्रसंगी बोलताना विधीज्ञ सुधाकरराव आव्हाड यांनी सांगितलं. याप्रसंगी युवकांचा कोथरूड-रत्न पुरस्कारानं गौरव करण्यात आला.

**<u>पुणे-फेस्टीवल</u>**

केळीचे खुंट, नारळाच्या झावळ्या, तोरण आणि फुकलम म्हणजे फुलांची रांगोळी यांनी सजवलेलं बालगंधर्व रंगमंदिर आणि रंगमंदिरात गणेश वंदनम, भरतनाट्यम, शास्त्रीय आणि अर्ध शास्त्रीय नृत्य, तिरुवथिरकली लोकनृत्य, मोहिनीअट्टम आदी नृत्य प्रकारांद्वारे मल्याळी संस्कृतीची दर्शन घडवणारा केरळ महोत्सव पुणे फेस्टिव्हल अंतर्गत काल आयोजित करण्यात आला. सर्वधर्मियांचा एकोपा दाखविणाऱ्या नृत्याविष्कारांनी प्रेक्षकांना विशेष आनंद मिळाला. या सर्व कार्यक्रमांमध्ये पुणे जिल्ह्यातील २०० हून अधिक केरळी युवक आणि युवती कलावंत सहभागी झाले होते. पुणे शहर आणि जिल्ह्यातील ३२ संस्थांनी मिळून बनलेल्या पुणे मल्याळी संघातर्फे या फेस्टिव्हलचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>मूर्ती</u>**

गणेशोत्सवासाठी पुणे महापालिकेचा पर्यावरण विभाग आणि लिबर्टी अर्थवेअर आर्ट यांच्या मदतीनं शाडू माती तसंच संगम मातीच्या मूर्ती विक्रीचा, 'मूर्ती आमची, किंमत तुमची' हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात पुणेकरांनी २१० शाडूच्या मूर्ती तर २०० संगम मातीच्या मूर्ती घेतल्या आहेत. शहरातील नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करत, शाडू मातीच्या मूर्ती खरेदी करण्यास प्राधान्य द्यावे या उद्देशाने महापालिकेकडून यंदा पहिल्यांदाच हा उपक्रम राबवला जात आहे.

**<u>चष्मा</u>**

आर एम डी फाऊंडेशनच्या वतीनं पुण्यातील ढोले पाटील वसाहत, गाडगे महाराज वसाहत, कोरेगाव पार्क आणि बर्निंग घाट बंड गार्डन मोफत डोळे तपासणी आणि चष्मा वितरण शिबिराचं आयोजन केलं होतं. या तिन्ही ठिकाणी मिळून दीडहजार पेक्षा अधिक स्त्री-पुरुष, वृद्ध तसंच लहान मुलांचे डोळे तपासण्यात आले तर बाराशे पन्नास लोकांनी मोफत चष्म्याचा लाभ घेतला.

**<u>अस्वच्छता</u>**

सार्वजनिक जागी थुंकणं, कचरा जाळणं, अस्वच्छता करणं, बांधकामाचा राडारोडा टाकणं, प्लास्टिक इत्यादि कारणांसाठी पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागानं गेल्या ११ महिन्यांत, ५७ हजार हून अधिक पुणेकरांना दंड करुन ३ कोटी रुपयांहून अधिक दंड वसूल केला आहे. विभागाचे प्रमुख आणि उपायुक्त संदीप कदम यांनी ही माहिती दिली.

पुणे आणि परिसरात उद्या पावसाच्या हलक्या सरी अपेक्षित आहेत. कमाल तापमान 30 अंश सेल्सियस राहील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**